# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री उन्नतीविषयक विचारांचा व कार्याचा अभ्यास

**कु. प्रज्ञा प्रसन्न भाटे** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

मो नं. 9834922505 Email- pradnyabhate3@gmail.com

---

**प्रस्तावना –**

भारतीय समाज व्यवस्थेविषयीचा सर्वव्यापक परीक्षण करणारा थोर सामाजिक, राजकीय आणि अर्थिक विचारवंत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिचित आहेत. खरे तर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य एका विशिष्ट दृष्टीकोनापुरते मर्यादित नव्हते तर ते सर्व मानवी समाजाला मार्गदर्शन करणारे आहेच. भारतीय संविधानाचे शिल्पकार यांनी हिंदू कोड बिलाव्दारे भारतीय त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध तरतुदी केल्या. मुलींना मुलांबरोबरचा वारसा हक्क प्राप्त व्हावा अशी तरतूद केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री सक्षमीकरणाचे खंदे पुरस्कर्ते राहिलेले आहे. त्यांनी आपल्या लेखणीत स्त्री सक्षमीकरणाची पाठराखण केलेली आहे. बाबासाहेबांनी आपल्या भाषणातून, चळवळीतून तसेच कायदामंत्री असताना स्त्री उन्नती विषयक कार्य तसेच कायदे करण्यासाठी प्रयत्न केलेले आहे. सर्व स्तरातील महिलांना त्यांचे हक्क आणि अधिकार प्राप्त व्हावेत यासाठी अविरत प्रयत्न केलेले आहेत. त्यांनी केलेल्या स्त्री विषयक केलेल्या कार्यामुळे भारतीय स्त्रियांची विविध अनिष्ट प्रथा, चालीरीती तसेच पुरुषसत्ताक बंधनातून मुक्ततेची सुरुवात झाली. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांची आणि अधिकार मिळवून दिले. स्त्रियांची सर्वांगीण प्रगती होण्यास कायद्याच्या माध्यमातून पाठबळ दिले. त्यांच्या स्त्री उन्नतीविषयक विचारांची आणि कार्य आजही मार्गदर्शक आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री उन्नतीविषयक विचारंचा तसेच त्यांच्या कार्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधनाचा हेतू -**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री उन्नतीविषयक विचारांचा अभ्यास करणे.

२. महिलांवरील आंबेडकरांच्या विचारसरणीचा प्रभाव अभ्यासणे.

३. समकालीन समाजातील महिलांच्या उन्नतीसाठी आंबेडकरांच्या विचारांची उपयुक्तता विषद करणे.

**संशोधन स्त्रोत -**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, मासिके शोध निबंध, वर्तमानपत्रातील निवडक लेख तसेच इंटरनेटवरील संदर्भ साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**सैद्धांतिक दृष्टीकोन -**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी आंबेडकरवादी स्त्रीवादी दृष्टीकोनाचा आधार घेतलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या प्रभावाचे सखोल आकलन, महिलांचे अधिकार आणि भूमिका याबाबत समकालीन चर्चा व सामाजिक चळवळीवर आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाच्या व्यापक परिणामाबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करण्याच्या क्षमतेमध्ये या अभ्यासाचे महत्त्व आहे.

**आशय विश्लेषण -**

भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक रुढी आणि परंपरापासून सुटका मिळावी यासाठी अथक प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. यात इतिहास कालीन स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास, चितंन, विविध लेख, पुस्तके मधून लिखाण अशा विविध आंदोलनामधून कार्य केले. स्त्रियांच्या उन्नतीसाठी आणि त्यांना सर्व अधिकार कायदयाने देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी खूप परिश्रम घेतले. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेलेले याची जाणीव जागृती व्हावी. स्त्रियांनी स्वावलंबी व्हावे, शिक्षित व्हावे म्हणजेच शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा नारा पुरुषापुरते मर्यादित किंवा ठराविक जाती पुरते मर्यादित नसून स्त्री-पुरुष अशा सगळ्यांनसाठी लागू होता. एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री उन्नती साठी त्याचबरोबर स्त्री ने आपले वेगळे व्यक्तिमत्व बनवावे, यासाठी त्यांनी पुरोगामी किंवा प्रगतीविषयक विचार मांडलेले दिसून येतात.

स्त्रियांना बंदिस्त करणारे धर्म, जात, कुटुंब,पुरुषसत्ताक व्यवस्था यावर त्यांनी आपल्या लेखणीतून परखड पणे भाष्य केलेले दिसून येते. त्यांच्या पुस्तकातून तसेच राज्यघटनेच्या माध्यमातून स्त्रियांना त्यांचे हक्क अधिकार प्राप्त व्हावेत आणि स्त्रियांना माणूस म्हणून त्यांची वेगळी ओळख निर्माण व्हावी यासाठी त्यांनी बहुमूल्य असे योगदान दिलेले आहे. तर या स्त्री उन्नतीबाबत विचारांचा आणि भूमिकेचा अभ्यास करण्यासाठी, त्याचबरोबर त्यांनी दिलेल्या योगदानाचे महत्त्व समजून घेण्यासाठी खालील मुद्दे विचारात घेता येतील.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री उन्नती विषयक विचार**

**१. स्त्रीयांनी स्वावलंबी बनावे-**

स्त्री स्वावलंबी बनावी तिच्या पायावर उभी राहावी म्हणून प्रयत्न केले त्याच्या नंतरची पुढची पायरी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना तिचे कायदेशीर हक्क मिळवून दिले. स्त्री स्वातंत्र झाली की तिचे कुटूंब पण स्वातंत्र्य होते. ते म्हणतात स्त्रीला सामाजिक स्वातंत्र्य मिळायला हवे. त्याच बरोबर तिला अर्थिक स्वातंत्र्य ही मिळायला हवे. जेणेकरून निर्णय प्रक्रियेमध्ये सशक्तपणे निर्णय घेऊ शकेल. बाबासाहेबांच्या मते स्त्री आणि पुरुषांचे संबध हे भागीदाराचे असावे. ज्ञान हे स्त्रीला दुःखातून मुक्त करते. त्यामुळे स्त्री ने शिक्षण घ्यावे स्त्रियांनी आत्मसन्मानाने जगणे गरजेचे आहे असे विचार मांडले.

**२. स्त्रिया आणि जातिव्यवस्थेबाबतचे विचार:**

भारतातल्या जातिव्यवस्थेच्या उतरंडीचा पाया आणि भारतीय स्त्रीवर पुरुषसत्ताक संस्थेचा आवळून बसवलेला चाप याचा संबंध आंबेडकरांच्या थिअरीज मधून डोकावत राहतो. शूद्र आणि स्त्री हे दोन्ही शोषित घटक आहेत आणि त्याचं स्वातंत्र्य जातीव्यवस्थेला परवडणारे नाही. स्त्रीवर बालविवाह ,जरठविवाह, केशवपन,परितक्त्या ,सती अशा विविध मार्गानें समाज अन्यायकारक नियंत्रण ठेवत राहतो ते नियंत्रण हटले पाहिजे असा बाबासाहेब यांचा कायम आग्रह राहिलाय.

**३. स्त्री पुरुष समानतेविषयक विचार-**

भारतीय स्त्री-पुरुषांना असलेला मतदानाचा अधिकार हा मुद्दा कधीकाळी वादाचा आणि अतिसंवेदनशील असू शकतो यावर कदाचित आज विश्वास नाही बसणार. देशाचे कायदे मंडळ निवडून देण्यात माझाही हातभार आहे हा विश्वास आणि अभिमान आज प्रत्येक मतदाराच्या मनात असतो या पाठीमागे भारतीय संविधानाने आर्टिकल ३२६ नुसार वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक स्त्री-पुरुष नागरिकाला दिलेला मतदानाचा अधिकार कारणीभूत आहे जो स्वातंत्र्यपूर्व काळात नव्हता. बाई पिढ्यान पिढ्या ज्या गोष्टींपासून वंचित राहिली आहे, त्या गोष्टी म्हणजे शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, संपत्तीवरील समान मालकी हक्क, स्वतःचा विकास करण्याचे, निर्णय घेण्याचे स्वतंत्र्य,भारतीय पुरुषसत्ताक व्यवस्थेचे जोखड फेकून देऊन तिला कायदेशीर रित्या समाजात अग्रेसर होता यावे यासाठी बाबासाहेब अग्रेसर होते.

**४. स्त्री शिक्षणविषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देताना तुम्ही सर्वप्रथम शिक्षित व्हा आपल्या मुलामुलींना शिकवा, त्यामुळे देशाचा विकास होईल, त्याचबरोबर तुमच्या अस्मितेचाही; तुम्ही पण माणूस आहात अशी तुम्हाला ओळख होईल. कारण शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे शिक्षणाचे महत्त्व त्यानी स्त्री वर्गाला दिले

डॉ. बाबासाहेबांची स्त्री शिक्षणाविषयक भूमिका तळमळीची आणि उदारमतवादी होती व त्यामुळेच स्त्री- शिक्षणाला चालना मिळाली. बाबासाहेबांनी ज्या अनेक परिषदा आयोजित केल्या, विशेषत: ज्या अखिल भारतीय महिला परिषदा सेल्फ आयोजित केल्या, त्यांत जे ठराव मांडले गेले, त्यांतही स्त्री शिक्षणावर भर दिसतो. स्त्रियांना शिक्षण दयावे एवढेच बाबासाहेबांचे मत नव्हते,तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सहशिक्षण द्यावे असे मत होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री उन्नतीविषयक कार्य:**

**१. हिंदू कोड बिल: स्त्री उन्नतीचा क्रांतिकारक जाहीरनामा:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या उन्नती बाबत केलेले क्रांतिकारी कार्य म्हणजे हिंदू कोड बिलची मांडणी होय. हिंदू समाजाचे सामाजिकदृष्ट्या एकीकरण करणारे, त्यांना एका सामाजिक स्तरावर आणणारे धार्मिक / वैयक्तिक कायदयांऐवजी धर्मनिरपेक्ष, कालसुसंगत, दोषरहित कायदयांद्वारे हिंदूचे आधुनिकीकरण करणारे, स्त्रियांना सामाजिक, राजकीय व कायदेशीर स्तरावर समानता प्रदान करणारे, लिंगभेद नष्ट करणारे असे हे हिंदू कोड बिल हे भारतातील कायदयाचा मसुदा होता.हा मसुदा 24 फेब्रुवारी 1949 मध्ये संसदेत मांडला गेला. स्वंतत्र भारताचे पहिले कायदे मंत्री डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी या भारतातील सर्व जाती-धर्मातील स्त्रियांना जाचक रुढी आणि परंपरांपासून सुटका मिळावी यासाठी हा मसुदा लिहिला. आंबेडकरांनी 4 वर्षे, l महिना आणि 26 दिवस त्यावर काम करून हे हिंदू कोड बिल तयार केले. हे बिल इ.स 1947 पासून ते फेब्रुवारी 1949 रोजी संसदेत मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही विशेष वर्ग किंवा विशेषतः जातीच्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल याची चिंता नव्हती. त्यांना सर्व जाती आणि वर्गाच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते की देशाच्या विकासासाठी देशाच्या सर्व वर्गातील लोकांना समानतेचा अधिकार भेटला पाहिजे. स्वतंत्र भारतातले पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1948 मध्ये संविधान सभेत 'हिंदू कोड बिल' चा मसुदा प्रस्तुत केला. त्यांनी आपल्या बिलामध्ये स्त्रियांना घटस्फोट देण्याचे अधिकार त्याचबरोबर विधवा आणि मुलींना संपत्तीमध्ये अधिकार असावा असा प्रस्ताव ठेवला होता. यामध्ये ज्यांनी आपले मृत्युपत्र बनवले नसेल, त्या व्यक्तीच्या संपत्तीमध्ये हिंदू स्त्री आणि पुरुषांना प्राप्त होणारी संपत्तीत कायद्याने वाटणी झाली पाहिजे असा प्रस्ताव सादर केला. या कायद्यानुसार मयत झालेल्यांच्या सर्व मुलगे आणि मुलींना समान वाटणीचे अधिकार देण्यात येतात.

या बिलामध्ये खालील प्रमाणे अधिनियम बनवले आहेत.

१. हिंदू विवाह अधिनियम

२. विशेष विवाह अधिनियम

३. दत्तक घेणे, दत्तकग्रहण अल्पायु संरक्षता अधिनियम

४. वारसा हक्क अधिनियम

५. पोटगी बाबत अधिनियम

६. दुर्बल आणि साधनहीन कुटुंबातील सदस्य यांना भरण पोषण अधिनियम

७. अप्राप्त वय संरक्षण संबंधी अधिनियम

८. हिंदू विधवाला पुनर्विवाह अधिकार अधिनियम

**२. स्त्रीयांसाठी प्रसूती रजेची तरतूद-**

1927 साली मुंबई विधान परिषदेवर निवडून आल्यानंतर 1928 साली भारतातील महिला कामगारांसाठी 'मॅटर्निटी बेनिफिट बिल' पहिल्यांदा सभेसमोर चर्चेसाठी आणणारे आणि स्त्रियांना बाळंतपणासाठी हक्काची वैदयकीय रजा मिळाली पाहिजे म्हणून आग्रही असणारे डॉ. बाबासाहेब हे पहिले सदस्य त्यांच्या प्रयत्नामुळे 'मॅटर्निटी बेनिफिट ॲक्ट(1961) अस्तित्वात आला. हा कायदा 'मातृत्व लाभ' म्हणजे कामावर पूर्ण पगाराची सुट्टी मिळण्याचा अधिकार देतो. 1989 च्या दुरुस्तीपूर्वी जर स्त्री कर्मचाऱ्यास तिच्या अपेक्षित प्रसूतीच्या संभाव्य तारखेच्या आधी सहा आठवड्याची रजा मिळू शकली नाही तर तिच्या प्रसूतीनंतर तिला सहा आठवडयाची रजा मिळू शकत होती आता जर स्त्रीकर्मचाऱ्यास अपेक्षित प्रसूतीच्या संभाव्य तारखेच्या आधी 6 आठवडे ची रजा मिळू शकली या अटीवर घेता येईल की प्रसुती पूर्वीची व प्रसूतीनंतरची तिची एकूण रजा 12 आठवड्यापेक्षा जास्त होता कामा नये.

**३. विविध सत्याग्रहातून स्त्री सक्षमीकरणास चालना -**

फक्त स्त्री मुक्ती किंवा स्वतंत्र आहे असे बोलून चालत नाही त्यासाठी ठोस कृती करावी लागते व ते डॉ. बाबासाहेबांनी केले. स्वतंत्र समता व बंधुता ही त्रिसूत्रे त्यांच्या चिकित्सेचा पाया होता. यासाठी त्यांनी इतिहासाचा अभ्यास केला. जातीअंतासाठी स्त्रियांनीच पुढाकार घ्यावा असे महाड सत्याग्रह परिषदेत त्यांनी जाहीर सांगितले. रमाबाईंना पण त्यांनी चळवळीत येण्यास प्रोत्साहन दिले. यामुळे नाशिक मधील काळाराम मंदिरात प्रवेश व महाड सत्याग्रहामध्ये महिलांची संख्या मोठी होती. स्त्रियांना सर्व पातळीवरील सर्व स्तरामध्ये सक्षम स्वतंत्र केले.

**निष्कर्ष -**

१. भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढवा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सतत प्रयत्न केले.

२. स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी क्रांतीकारी हिंदू कोड बिलाची मांडणी केली.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री उन्नतीविषयक कार्यामुळे सर्व घटकातील स्त्रियांना आपल्या हक्कांची जाणीव होण्यास मदत झाली.

४. शोषित दलित,वंचित,अनुसूचित जाती-जमातीतील स्त्रियांना आपल्या हक्कांविषयी अधिकार प्राप्त होण्यास मदत झाली.

५. आज स्त्रिया विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजवीत आहेत. याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री उन्नतीविषयक कार्याला दयावे लागेल.

**सारांश-**

आजची स्त्री स्वतःच्या हक्कांबद्दल सजग आहे, जागरूक आहे, तिला तिचे अधिकार माहित आहेत. तिच्या हक्कांसाठी तिला लढता येते. तिला सामाजिक, राजकीय दृष्ट्या ठाम भूमिका घेता येते. तिच्याविरुद्ध झालेल्या अन्यायाविरुद्ध तिला दाद मागता येते. या अनेक गोष्टींचे श्रेय आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हिंदू कोड बिलातील तरतुदीमुळे भारतीय स्त्रियांच्या उन्नतीला चालना मिळाली. त्यांनी स्त्रियांच्या हक्क तसेच अधिकारांविषयी जाणीव जागृती निर्माण करण्यात बहुमोल योगदान दिलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री उन्नती विषयक विचार आणि केलेले कार्य त्याची प्रस्तुतता आजच्या काळात ही प्रकर्षाने जाणवते. स्त्रिया आज विविध क्षेत्रात नावलौकिक करत असल्या, कार्यकर्तृत्व गाजवत आहेत. स्वावलंबी होत आहेत. तरी त्यांना सक्षमीकरणाचा खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्यांना सदैव मार्गदर्शन करीत राहतील. आज एकविसाव्या शतकातही स्त्री सक्षमीकरणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मार्गदर्शक आहेत.

**संदर्भ ग्रंथ-**

१. कीर धनंजय (१९६६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२. वैद्य प्रभाकर(१९८१), डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म, शलाका प्रकाशन.

३. कसबे रावसाहेब (१९८५), आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे.

४. आहेर अविनाश (१९६६ ),डॉ. बाबासाहेब आणि आम्ही, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

५. मनोहर यशवंत (१९९९), आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन ,नागपूर